अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसुचना/ ९२० /२०२६ दि.९२ /०६/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे मार्फत ए.आय.सी. इन्फ्रास्ट्रक्चर, मुंबई यांचेकडुन बारवी डॅम पाणी पुरवठा योजना अंतर्गत खोणी ते फॉरेस्ट नाका बी.जी.मेन पाईपलाईन सर्व्हिसरोडचे कॉक्रीटीकरण व काकोळेगाव येथील जुना पुल निष्काशीत करुन नवीन पुलाचे बांधकाम दिनांक ०८/०२/२०२६ रोजी पासुन चालु असुन अद्याप पावेतो काम पुर्ण झालेले नाही. सदर कामा करीता दि.३१/०५/२०२६ रोजी पर्यंत वाहतूक अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली होती. परंतु काम पुर्ण झालेले नसल्याने सदरचे काम दि.३०/०८/२०२६ रोजी पावेतो चालणार आहे. त्यामुळे सदर रोडवरून जाणारी सर्व प्रकारची वाहने इतर मार्गाने वळविण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) बदलापुर कडुन काटईकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आनंदनगर एम.आ.डी.सी. पोलीस चौकीच्या पुढे ३०० मिटर अंतरावर 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने आनंदनगर एम.आ.डी.सी. पोलीस चौकीच्या पुढे ३०० मिटर अंतरावर कट उजव्या बाजुला वळण घेवुन काटई–बदलापुर रोड वरुन पुढे अप्रत्यीम हॉटेल समोरील कट मधुन डाव्या बाजुला मुख्य रोडवर वळण घेवुन पुढे इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) कमलधाम आश्रम व अप्रत्यीम लॉज कडुन काकोळेगाव कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **काकोळेगाव पुला जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – **सदरची वाहने अप्रत्यीम हॉटेलच्या बाजुने डाव्या बाजुस वळण घेवुन पुढे** ईच्छीत स्थळी जातील.

सदर अधिसुचना **दि.०१/०६/२०२६ रोजी पासुन दि.३०/०८/२०२६ रोजी पर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ.

प्रत कार्यवाहीसाठी :–
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे
प्रत :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, अंबरनाथ, उल्हासनगर, विठठलवाडी वाहतूक शाखा.